*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XII / Issue – I* *ISSN 2277-8063*

# महात्मा गांधी यांचे महिला सबलीकरण विषयक विचार

**Tejaswini H. Bhosale**

Research Student, Dept. of Political Science Shivaji University, Kolhapur

**प्रस्तावना :** महिलांचे समाजातील स्थान व त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी महात्मा गांधीजींचे मोलाचे योगदान होते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थे मध्ये महिलांना अनेक बंधनामध्ये बंदिस्त केले होते. त्याचे विश्व चार भिंतीच्या आत होते. महिला कुप्रथा मध्ये अडकून ठेवले होते अशा परिस्थितीमध्ये महात्मा गांधीजींनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी महत्वपूर्ण विचार मांडून महिलांचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले होते.

**गृहीतके :**

१. महात्मा गांधीजी हे स्त्री –पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते.
२. महात्मा गांधीजीचे महिला सबलीकरणाविषयक विचार
३. महात्मा गांधीजी महिला शिक्षण व स्वातंत्र्यांचे पुरस्कर्ते होते.

**उद्दिष्टे**

१. महात्मा गांधीजी हे स्त्री –पुरुष समानतेचे पुरस्कर्ते कसे होते यांचा अभ्यास करणे
२. महात्मा गांधीजीचे महिला सबलीकरणासंदर्भात विचारांचा अभ्यास करणे.
३. महात्मा गांधीजीचे महिला शिक्षण व स्वातंत्र्यविषयीच्या विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत विषयासाठी ग्रंथालयीन संशोधन पद्धतीचा वापर केला आहे.विविध संदर्भ ग्रंथाचा वापर केला आहे.

**महात्मा गांधीजीचे महिला सबलीकरणाविषयक विचार :** समाजव्यवस्थेतमध्ये स्त्रियांना त्यांचे हक्क व स्वातंत्र्य नाकारले होते. बालविवाह, सतीप्रथा,जरठकुमारी विवाह, विधवा विवाह विरोध इत्यादी प्रथा परंपरांमध्ये स्त्रियांना अडकून ठेवले होते. या सगळयातून स्त्रियांन बाहेर काढून त्यांना त्यांचे हक्क देण्याचे मत महात्मा गांधीचे होते. स्वराज्यांच्या लढयात स्त्रियांनीही सहभागी व्हावे असे मत महात्मा गांधीजींचे होते.

समाजामध्ये ज्या अनिष्ठ परंपरा आहेत यांचा अन्याय स्त्रियांवर होतो. अशा अनेक प्रथांना गांधीजींनी विरोध केला. बालविवाह, हुंडा पद्धती, बहुपत्नित्व, सतीप्रथा अशा प्रकारच्या प्रथांचे समाजातून उंचाठन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. गांधीजीच्या मते '' बालविवाहातून विधवा झालेल्या स्त्रियांचा विवाह होणे गरजेचे आहे'' (१) बालविधवांना त्यांचे उरलेले आयुष्य वैधव्यात जगावे लागत होते. स्त्रियांची दिन व केविलवाणी स्थिती संपुष्टात यावी यासाठी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.

रुढी व कायदे पुरुषांनी घडवले होते जे घडविण्यात स्त्रियांचा काहीच भाग नव्हता अशा रुढी व कायद्यांच्या खाली स्त्रियांना चुरडून टाकण्यात आले होते. स्त्रीने नेहमी पुरुषांची मदतनीस झाली पाहिजे. स्त्री–पुरुष यांनी एकमेकांच्या सहकार्याने सल्याने घडले पाहिजे. पुरुषांना जसे त्याचे भवितव्य घडविण्याचा अधिकार आहे. तसा स्त्रियांनाही अधिकार आहे. या मताचे गांधीजींचे विचार होते.

समाजव्यवस्थेने स्त्रियांना शिक्षणांचा हक्क नाकारल्यामुळे स्त्रियांचा विकास मार्ग पूर्ण खुंटला होता. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही शिक्षणांचा अधिकार मिळाला पाहिजे. असे गांधीजींना वाटत होते. या संदर्भात गांधीजी म्हणतात की, '' पूर्ण अर्थाने स्वराज्य हवे असेल तर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देणे आवश्यक आहे.'' (२) स्त्रियांनी शिक्षण घेतलेतर तिच्यामुळे संपुर्ण कुटुंब शिक्षित होऊन कुटुंबाचा विकास होईल.

गांधीजी सांगता, ''स्त्री अबला कशी मला कळत नाही ठोसा लाबण्यात स्त्री जरी दुबळी असली तरी सहनशीलतेत ती बलवत्ती आहे. मग स्त्री जात पुरुषा पेक्षा अधिक थोर ठरते. स्वत:ला किंवा आपल्या जोडीदाराला जगात अधिक चांगल्या रितीने जगता यावे अशी परिस्थिती

निर्माण करण्याची ताकद तिच्यात आहे. त्यागाची आणि अहिंसेची मूर्ती म्हणून मी तिचे वर्णन करतो.'' (३) स्त्रीयांनाही पुरुषा प्रमाणे स्वातंत्र्य,हक्क, कर्तबगारी, उपजीविकेची संधी दिली पाहिजे स्त्रीयानाही आर्थिक दृष्टया स्वालंबी व्हावे चरख्यासारख्या लघुउद्योगांची उपलब्धता करुन दिली.

गांधीजींनी स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांना सामावून घेऊन स्त्री सुधारणेच्या क्षेत्रात कार्य केले. गांधींच्या स्त्रीविचारातून स्त्रियांना त्यांच्या सामाजिक आणि राजकीय हक्कांची जाणिव निर्माण झाली होती स्त्रियांमध्ये वैचारिक जागृती होवून स्त्रिया राजकारणात व समाजकारणात सहभागी होऊलागल्या. महात्मा गांधीजीनी ब्रिटिश विरोधी दिलेल्या लढयात महिलांचा लक्षणीय सहभाग होता. स्त्रियांनी त्यांचे स्त्रित्व सांभाळून पुरुषांच्या बरोबरीने कार्यकरण्यासाठी गांधीजींचे विचार उपयुक्त पडले. स्त्रीला सबला होण्यासाठी त्यांचे विचार उपयुक्त ठरले.

एकोणिसाव्या शतकामध्ये भारतात स्त्रीयांचा राजकारणात सहभाग हा लोकमान्य टिळकांच्या होमरूल चळवळीत झाला. पण स्त्रीला स्वातंत्र्य लढयात सामील करून घेण्याविषयी गांधीजींची भूमिका स्त्रीच्या जीवन समग्रतेच्या विचारपद्धतीशी तर्क संगत अशी परिणती होती. ते असे प्रतिपादन करतात की, 'स्त्री—पुरूष तत्वता समान आहेत. स्त्रीला स्वतःचे व्यक्तिमत्व आहे. घराच्या चार भिंतींतून स्त्रीया बाहेर पडल्याशिवाय स्वतंत्र चळवळीला सामर्थ्य प्राप्त होणार नाही. स्वातंत्र्यलढयामध्ये संसारी स्त्रीयांचा प्रत्यक्ष सहभाग असलेले विषय हे स्वतंत्र आंदोलनाचे व विधायक कार्याचे विषय होते. उदा— जंगल सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह, दारूबंदी, सूतकताई, ग्रामोद्योग, साक्षरता प्रसार इ. अहिंसात्मक सत्याग्रहसाठी आवश्यक असलेले धैर्य आणि आत्मक्लेश सहन करण्याची शक्ती स्त्रीयांकडे विशेष करून असल्याने स्वतंत्र लढयात स्त्रीया महत्वाची भूमिका बजावू शकतील असा गांधींजींना विश्वास वाटत होता. या प्रेरणेने अनेक स्त्रीया स्वतंत्र्यलढयात सहभागी झाल्या'. (४) महात्मा गांधीजींना हिंसा मान्य नव्हती त्यामुळे अहिंसेच्या तंत्राने स्त्रिया स्वतंत्र चळवळीत सहभागी झाल्या होत्या. राजकारणात व समाजकारणात स्त्रीयांनी सहभागी व्हावे असे गांधीजींना वाटत होते.

गांधींजींच्या मते स्त्रीयांनी स्वदेशीचा प्रचार करावा. गांधीजी सांगतात की, 'चरखा चालविणे व खादी वापरणे हे स्त्रीयांनी आपले धार्मिक कर्तव्य मानले पाहिजे. स्त्रीयांनी परदेशी कपडे, दागिने व साज शृंगार याचा त्याग करावा'. (५) परदेशी कपडे वापरू नये. स्त्रीयांनी शृंगार करण्यास नकार दिला पाहिजे, वेश्या व्यवसायापासून स्त्रियांना परावृत्त करणे, चरख्याचा अवलंब करून स्वावलंबी करणे यासाठी गांधीजी प्रयत्न करत होते.

महात्मा गांधीजींच्या राजकीय क्षितिजावरील उदयानंतर स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय सहभागाला वेगळे परिणाम प्राप्त झाले. एकीकडे गांधीजींच्या अहिंसात्मक चळवळीमुळे स्वतंत्र आंदोलनात स्त्रियांचा सहभाग वाढला. तर दुसरीकडे सामाजिक व राजकीय जागृतिमुळे स्त्रियांच्या संघटना उभ्या राहिल्या. सत्याग्रहासाठी आवश्यक असणारे धैर्य शोशिकता आणि आत्मिक सामर्थ्य या विशेष गुणामुळे स्वतंत्र लढयात महत्वाची कामगिरी बजावू शकतील, या गांधींजींच्या प्रेरणेमुळे अनेक स्त्रिया अहिंसक लढयामध्ये सहभागी होवू शकल्या. अहिंसेंच्या पायावर उभ्या असलेल्या समाजरचनेत पुरूषाला जे अधिकार असतील ते स्त्रियांनाही असतील.

गांधींजींचे हुंडयाची चाल बंद व्हावी असे मत होते. हुडयाबद्दल आग्रह धरणारा तरूण स्वतःच्या शिक्षणाला बट्टा लावतो. तो देशालाही कलंकीत करून स्त्री जातीचा अपमानही करतो हुंडयाच्या या अधःपतनकारी प्रथेविरूध्द जोरदार लोकमत तयार करण्याची गरज आहे. आणि जे तरूण या पापमय पैशाचा स्वीकार करतील, त्यांच्यावर समाजाने बहिष्कार टाकावा. मुलींच्या माता—पित्यांची इंग्रजी पदव्यांचा मोह सोडावा. आणि आपल्या मुलींना सन्मानाने वागवणाऱ्या जावयांच्या शोधात आवश्यक तर जातीय बंधने तोडण्याचीही तयारी ठेवावी. (६) असे मत गांधींजींचे होते. लग्नाला सौदयाचे रूप येवू नये यासाठी ही प्रथा बंद झाली पाहिजे, हुंडयासाठी स्त्रियांचे शोषण होवू नये असे गांधीजींना वाटत होते.

**निष्कर्ष :**

१. म.गांधीजीच्या स्त्रियांविषयीच्या दृष्टिकोनामुळे स्त्रियांमध्ये आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली.

२. स्त्री—शिक्षणामूळे त्यांच्या समाजातील दर्जाचे स्थान उंचविण्यास मदत झाली

NAVJYOT / Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

३. महिला सबलीकरणबाबतची म. गांधीजींची भूमिका महत्वपूर्ण ठरली.

**संदर्भग्रंथ :**

१. महात्मा गांधी (२०१९) — 'महात्मा गांधी विचार संग्रह रिया पाब्लिकेशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र.७२
२. पाटील डॉ. डी. आर (संपादक), 'महात्मा गांधी विचार व समकालिन समाज' पृष्ठ क्र. १०५
३. पांढरीपांडेसु. श्री (१९९९) : 'गांधीवाद आणि स्त्रीवाद समीक्षा : संकल्पना आणि उपाय योजना का. स. वाणी प्रगत अध्ययन संख्या प्रकाशन पूणे, पृष्ठ क्र. ८७
४. पाटील भारती, (२०१४), 'स्त्रिया समाज आणि राजकारण', प्रतिमा प्रकाशन पुणे, पृष्ठ क्र. ६७
५. कुंभार नागोराव, (२०१२), 'महात्मा गांधींचे सामाजिक तत्वज्ञान', अरूणा प्रकाशन लातूर, पृष्ठ क्र. ८९
६. महात्मा गांधी (२०१९) — 'महात्मा गांधी विचार संग्रह' रिया पाब्लिकेशन, कोल्हापूर, पृष्ठ क्र. २९६